महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/१५७९७
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २८/०६/२०१८

# परिपत्रक

**विषय :** महावितरण कंपनीत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांनी वैयक्तिक कामासाठी राजकीय पक्षाकडून किंवा तिऱ्हाईत व्यक्तीकडून दबाव आणणेबाबत.

........

महावितरण कंपनीत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांनी वैयक्तिक कामासाठी उदाहरणार्थ नियुक्ती, पदोन्नती, बदली इत्यादी व यासारख्या इतर कामांकरिता वरिष्ठ अधिकाऱ्यांवर राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार, कंपनी बाहेरील अधिकारी, पदाधिकारी किंवा इतर प्रभावी/वजनदार वरिष्ठ अधिकारी यांचेकडून शिफारशीचा प्रयत्न केल्यास संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंग कारवाई करुन संबंधितांच्या सेवापुस्तिकेत व गोपनीय अहवालात त्या संदर्भात नोंद करण्याबाबतच्या सूचना यापूर्वी वेळोवेळी देण्यात आलेल्या आहेत.

२. सद्यस्थितीत असे निदर्शनास येते की, वेळोवेळी वरीलप्रमाणे सूचना पारित करुनही काही अधिकारी/ कर्मचारी हे त्यांच्या वैयक्तिक कामाकरिता उदाहरणार्थ नियुक्ती, पदोन्नती, बदली इत्यादी व यासारख्या इतर कामांकरिता वरिष्ठ अधिकाऱ्यांवर राजकीय पक्षांकडून किंवा इतर प्रभावी/ वजनदार व्यक्तींकडून दबाव आणत असल्याचे तसेच शिफारशीचा प्रयत्न करत असल्याचे आढळून आले आहे. संबंधीत कर्मचाऱ्याची सदरची कृती या संदर्भात वेळोवेळी पारित केलेल्या सूचनांच्या विरुध्द आहे.

३. सर्व नियंत्रण अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, प्रशासकीय परिपत्रक क्र. ४९८ दि. २०/१०/२०१४ मधील तरतुदी/सूचना आपले अखत्यारितील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास पुनश्च आणून द्याव्यात व त्यांचे काटेकोरपणे पालन होईल याबाबतची खबरदारी घ्यावी. त्याचप्रमाणे या आदेशांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून मानव संसाधन प्रणालीमध्ये अशा अधिकारी/ कर्मचारी यांच्या वैयक्तिक माहितीमध्ये नोंद घेण्यात यावी. त्याचप्रमाणे प्रकरणपरत्वे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर शिस्तभंग कारवाई करण्यात यावी.

४. सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(चंद्रशेखर येरमे)
**कार्यकारी संचालक (मासं)**